हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)

(०२३५८) २८२३८७

अंक ४५/२०२० | **दिनांक ०५/०६/२०२०** | **कालावधी ५ दिवस**

डॉ. प्रशांत बोडके,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

डॉ. विजय मोरे,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

डॉ. शितल यादव,
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०५/२०२० ते ०५/०६/२०२०)							हवामानाचे घटक	हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून १०/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)				
३०/०५	३१/०५	०१/०६	०२/०६	०३/०६	०४/०६	०५/०६		०६/०६	०७/०६	०८/०६	०९/०६	१०/०६
-	-	-	-	-	-	-	पाऊस (मिमी)	१३	१४	१५	६	६
-	-	-	-	-	-	-	कमाल तापमान (अं.से)	३१	३०	३१	३१	३१
-	-	-	-	-	-	-	किमान तापमान (अं.से)	२५	२५	२५	२६	२६
-	-	-	-	-	-	-	मेघाच्छादन (ऑक्टा)	४	२	१	१	३
-	-	-	-	-	-	-	सकाळची सापेक्ष आर्द्रता	९४	९३	९२	९१	९२
-	-	-	-	-	-	-	दुपारची सापेक्ष आर्द्रता	७५	७०	७०	६६	६६
-	-	-	-	-	-	-	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	७	९	७	५	६
-	-	-	-	-	-	-	वाऱ्याची दिशा	आ.द.	आ.द.	आ.द.	आ.द.	द.

पाऊस (मिमी) मागील आठवडयातील	पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत	पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा
०.०	०.०	५१९७.२

हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

दिनांक ६ ते १० जून, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.

पिक	अवस्था	*कृषि सल्ला*
खरीप भात	**रोपवाटिका**	• पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने भात रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. • रोपवाटिकेसाठी तयार केलेल्या गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट आणि ०.८ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावीत. वाफ्यावर ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सें. मी. खोलीवर बी पेरून मातीने झाकावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून बियाणे पेरावे. • रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील ६ ई. सी. ३ मि. ली. प्रती लिटर पाणी या प्रमाणात गादीवाफ्यावर एकसारखे फवारावे. • जमिनीत ओलावा असल्याने भात पिकाची पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरणी करावी आणि नांगरणीच्या वेळेस चांगले कुजलेले शेणखत एकरी ३ टन जमिनीत मिसळावे. • भात रोपवाटिकेस ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी.
नागली	**रोपवाटिका**	• पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नागली रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. • रोपवाटिकेसाठी तयार केलेल्या गादीवाफ्यावर प्रती गुंठा क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया खताची मात्रा द्यावी. वाफ्यावर दोन ओळीतील अंतर १० सें.मी. ठेवून बी ओळीत पेरावे. पेरणी विरळ व उथळ करावी. बी मातीने झाकून घ्यावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून बियाणे पेरावे. • जमिनीत ओलावा असल्याने नागली पिकाची पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरणी करावी आणि नांगरणीच्या वेळेस चांगले कुजलेले शेणखत एकरी २ टन जमिनीत मिसळावे.
आंबा व काजू	**-**	• चक्रीवादळामुळे जी झाडे, झाडांच्या फांद्या मोडून पडलेल्या असतील ते स्वयंचलित करवतीच्या सहाय्याने तिरकस कापावीत आणि पाऊसाची तीव्रता कमी असताना कापलेल्या भागाला १ टक्के बोर्डो पेस्ट लावावीत. काजू आणि आंबा झाडांच्या बाबतीत कापलेल्या फांद्यावर व खोडावर किडींचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात द्रावण करून संपूर्ण झाडावर पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. • मुख्यत: आंबा बागांमध्ये फळगळ झालेली फळे गोळा करून खोल जमिनीत गाडून द्यावीत जेणेकरून पुढील हंगामात फळमाशीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.
नारळ	**-**	• नारळ बागांची साफसफाई करून गोळा होणाऱ्या काडीकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट करावी. • चक्रीवादळामुळे नारळाच्या कोंबाला इजा झाली असल्यास कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. यासाठी कोंबामध्ये १ टक्का बोर्डोमिश्रणाची आळवणी करावी. • नारळ बागेमध्ये पावसाळ्यात बुरशीजन्यरोगामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.
सुपारी	**-**	• सुपारी बागांची वाळलेल्या झावळ्या, शिंपुटे काढून साफसफाई करून गोळा होणाऱ्या काडीकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट करावी.

		• सुपारी बागेमध्ये पावसाळ्यात बुरशीजन्यरोगामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पानांच्या बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.
भाजीपाला	**रोपवाटिका**	• काकडी, चिबूड, पडवळ, दोडका, कारली या वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी. लागवड आळे पद्धतीने १.५ x १.० मीटर करावी. लागवड करताना प्रत्येक आळ्याला २ किलो शेणखत व ५० ते ६० ग्रम मिश्रखत (सुफला) मातीत मिसळून देण्यात यावे. • वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपवाटिका तयार करावयाची राहिली असल्यास, रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे. तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी. • रोपवाटीकेतील वांगी, मिरची, टोमेटो इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी तसेच रोपवाटिकेला ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी.
दुभती जनावरे/ शेळ्या	**-**	• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. • जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे. • जनावरांना आंत्रविषार रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे.

टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.